दै. गोदातीर समाचार दि. ०४/११/२०२२



# चोरीस गेलेले पावणेआठ लाख रुपयांचे ५६ मोबाईल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



नांदेड- जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणांहून व बाजारातून महागडे मोबाईल गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्याकरिता पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर यांना आदेशीत केले होते. यावरून चिखलीकर यांनी पोलीस अंमलदाराचे एक पथक तयार करुन मिसींग-मधील मोबाईलचा शोध घेणे चालू केले होते.

स्था. गु. शा. पथकाने नांदेड शहरातील व जिल्ह्यातील गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन नांदेड जिल्ह्यातील एकूण ५६ मोबाईल किंमती ७ लाख ७६ हजार ६४ रुपयांचे मोबाईल हँडसेट हस्तगत केले आहेत. संबंधितांनी मोबाईलचे IMEI नंबरची खात्री करुन ज्यांचे मोबाईल आहेत त्यांनी घेऊन जाण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून कण्यात येत आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या आदेशावरून द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि दत्तात्रय काळे, गोविंद मुंडे, गंगाप्रसाद दळवी, पोलीस अंमलदार संजय केंद्रे, गंगाधर कदम, सुरेश घुगे, दशरथ जांभळीकर, सखाराम नवघरे, गणेश धुमाळ, विलास कदम, विठ्ठल शेळके, बालाजी यादगीरवाड, पदमसिंह कांबळे, बालाजी तेलंग, गजानन बयनवाड, महेश बडगू व सायबर सेलचे पोह राजू सिटीकर, दीपक ओढणे यांनी पार पाडली. सदर पथकाचे पोलीस अधीक्षक कोकाटे यांनी कौतुक केले आहे.